**प्रतिवादी क्र. १ यांच्या विरूध्द दावा विना कैफियत चालवण्याचा आदेश झाल्यामुळे १ तर्फे उलटतपास नाही.**

**<u>वादीतर्फे सा.क्र. १ चा उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. खेडमनोरकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू:–</u>**

९. माझे वडील मारूती रामा मुगळे साधारणत: २५ वर्षापुर्वी वारले व आई कोरोनामध्ये ५ ते ६ वर्षापुर्वी वारली. माझे वडील मारूती यांना एक सख्खा भाऊ संदिपान व दोन सख्ख्या बहिणी निलुबाई व सुंदरबाई अशा होत्या. सदर वर नमुद माझ्या दोन्ही आत्या मरण पावल्या आहेत व त्यांची मुले, नातु हयात आहेत. मी वादमिळकतीचा ७/१२ दावा दाखल केल्यानंतर बघितला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दोन्ही अत्त्यांचे वाद मिळकतीच्या ७/१२ उतारावर वारस म्हणुन नाव नमुद केलेले आहेत.

१०. मला सख्खा भाऊ नाही. माझ्या चार बहिणींचे लग्न १९९३ च्या भुकंपापुर्वी झाले. माझे आई वडील फत्तेपुर गावात राहत होते. माझी बहिण सुशिला हिला गावात दिले आहे व बाकी माझ्यासह इतर बहिणींना परगावी दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत ही हलकी जमिन आहे. हे

म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीपैकी १ ते २ एकर जमिन भारी आहे व इतर जमिन हलकी आहे.

११. माझे वडील मारूती यांनी २ एकर जमिन आनंत खंडाळे यांना विकली होती. मला माहित नाही की, सध्या सदर जमिन कोण कसत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांचे वृध्दपकाळात माझी गावातील बहिण प्रतिवादी क्र. २ व तिचे पती वडीलांच्या मालकीचे जमिन कसत होते व उत्पन्न घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहिण सदर मिळकतीतुन येणा–या उत्पन्नातुन व तिच्या वैयक्तिक उत्पन्नातुन आई वडीलांचा दवाखाना व त्यांचा इतर खर्च करत होती. हे म्हणणे खरे आहे की, गावातील वडीलांचे घर हे भुकंपामुळे पडले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हापासून माझे आई वडील बहिण सुशिला हिच्या घरात राहत होते. सदर भुकंपात पडलेले घर हे अदयाप माझे मयत वडीलांच्या नावे आहे.

१२. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांची डोक्याची शिर दबली या कारणामुळे ते विवेकानंद हॉस्पीटल, लातूर येथे १० दिवस अंतररूग्ण म्हणुन उपचार घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे दवाखान्याचे बिल अडीच लाख झाले होते. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, ५०,०००/– रूपये झाले

होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर वडीलांचे दवाखान्याचे सर्व बिल बहिण सुशिला हिने अदा केले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई देखील पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे पोतदार हॉस्पीटल, लातूर येथे ॲडमिट होती व तिचे देखील दवाखान्याचे बिल १५,०००/– झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे बिल बहिण सुशिला हिने दिले होते.

१३. हे म्हणणे खरे नाही की, सुशिला सोडुन आम्ही इतर बहिणी गावामध्ये काही कार्यक्रम असेल तरच वर्षातुन एक ते दोन वेळा येत होतो. हे म्हणणे खरे आहे की, वडील हयात असल्यापासून वडीलोपार्जीत सर्व जमिन बहिण सुशिला ही वहिवाटत आहे व उत्पन्न घेत आहे. आम्ही इतर बहिणींना त्यातील उत्पन्नाचा एक रूपयाही मिळालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आई वडील हयात असतानापासून सदर उत्पन्नातील एक रूपयाही बहिणीकडे मागितला नाही.

१४. हे म्हणणे खरे आहे की, सदर वडीलोपार्जीत जमिनीवर आम्ही मागील १५ ते २० वर्षापासून कधीही गेलो नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहिण सुशिला गावातच राहत असल्यामुळे व आई वडीलांचे पालनपोषण करत असल्यामुळे ते सदर जमिन तिलाच घ्या असे म्हणत होते. हे म्हणणे खरे

आहे की, माझे पती सरकारी नौकरीत होते व इतर बहिणींनाही मोठया प्रमाणात नव–याकडील मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आई वडीलांची सर्व जमिन बहिण सुशिला हिला दयावी अशी आई वडीलांची शेवटची इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत आम्हा सर्व बहिणींना सांगण्यात आले होते व आम्ही त्यास नाहरकत दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझी बहिण सुशिला ही सर्व वडीलोपार्जीत जमिनीची मालक आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आमचा इतर बहिणींचा सदर मिळकतीशी कुठलाही हक्क संबंध राहिला नाही.

१५. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकुर की, वादमिळकत ही एकत्रीत कुटूंबातील संयुक्त अविभक्त मिळकत आहे व सर्व हिस्सेदार त्याचा एकत्रीत उपभोग घेत आहेत हा मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील सर्व मजकुर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by SUJIT BABRUWAHAN PATIL
Date: 2026.07.08 15:52:28 +0530

(एस. बी. पाटील)

दिनांकः–०८.०७.२०२६

दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.